

# रोजगार हमी आणि स्त्रिया

**सीमा काकडे**

गावा-गावातल्या, वाड्या-वस्त्यांमधल्या कारभारणींनो, दिवाळीच्या निमित्तानं तुम्ही सगळ्याचजणी मागच्या वर्षात काय-काय घडून गेलंय आणि येत्या वर्षात काय-काय घडू घातलंय याचा धांडोळा घेत असणार. घडामोड कोणत्याही विषयातली असली तरी त्याचा धागा आडवळणानं का होईना, पण तुमच्या जगण्याशी भिडणारा असतो, याचा अनुभवही तुम्ही कधी ना कधी नक्कीच घेतलेला असणार. या लेखाच्या निमित्ताने एका महत्त्वाच्या विषयाबद्दलच्या घडामोडीबाबत तुमच्याशी बोलावंसं वाटतंय. विषय महत्त्वाचा अशासाठी की त्याचा धागा आडवळणानं नाही तर थेटपणेच आपल्या जगण्याशी भिडणारा आहे. विषय आहे 'रोजगार हमी योजनेचा'.

तुमच्यापैकी ज्यांना या योजनेचा अनुभव आहे, त्या नक्कीच सांगणार – हा विषय तसा जिता-जागताच! सगळ्यासाठीच महत्त्वाचा – हातावर पोट असणाऱ्या, घर चालवण्याची जिम्मेदारी असणाऱ्या आया-बाप्यांसाठीच नाही तर या योजनेचा मलिदा मिळावा म्हणून धडपडणाऱ्या कंत्राटदारांसाठी, त्यांच्या नावावर तो आपल्यालाही मिळावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या गावपातळीपासून राज्यपातळीवरल्या सरकारी अधिकारी-कर्मचारी आणि पुढाऱ्यांसाठी. त्याचप्रमाणे असंघटित कष्टकऱ्यांना सन्मानानं जगण्याचा हक्क मिळालाच पाहिजे म्हणून प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी आणि ज्यांना अधिकाराचा आणि सरकारी यंत्रणेचा उपयोग लोकांचे जगण्याचे प्रश्न सोडवण्यासाठी करायचाय, अशा सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी.

महाराष्ट्र राज्याची रोजगार हमी योजना आहेच अशी खास – या योजनेबद्दल दोन महत्त्वाच्या घडामोडींबाबत तुमच्याशी बोलायचं आहे.

पहिली घडामोड तुम्हाला नक्कीच माहीत असणार. महाराष्ट्र राज्याच्या धर्तीवर केंद्रसरकारने रोजगार हमीचा कायदा नुकताच म्हणजे सप्टेंबर महिन्यात लागू केलाय. म्हणजेच आत्तापर्यंत आपल्या राज्यात असणारी योजना आता संपूर्ण देशात लागू होणार हे सहजा-सहजी भुळीच घडलेलं नाही. डाव्या राजकीय पक्षांनी तसंच देशभरातल्या

संघटना अणि संस्थांनी अभ्यासकांनी त्यासाठी खूप काळ जोर लावला आहे आणि आघाडी सरकारला त्यांनीच किमान समान कार्यक्रमात दिलेलं आश्वासन प्रत्यक्षात आणायला भाग पाडलेलं आहे.

'हक्काचा रोजगार' मिळणं ही बायांसाठी किती महत्त्वाची गोष्ट आहे हे मी तुम्हाला सांगायलाच नको. पण अजूनही एका दृष्टीनं ही घडामोड महत्त्वाची आहे याकडे तुमचं लक्ष वेधावंस वाटतं. लोकांच्या जगण्याचे प्रश्न सोडवायला सरकार बांधील नाही, ती जबाबदारी बाजारानं घ्यावी. थोडक्यात म्हणजे 'बळी तो कान पिळी' अशी भूमिका सरकार ज्या त्या विषयात घेत असताना रोजगाराची हमी देण्याची जबाबदारी सरकारनंच घेणं, ही खूपच महत्त्वाची गोष्ट आहे. ठिकठिकाणी सरकारी कारभार सुधारण्याचा आणि त्यातून सरकारी यंत्रणेची लोकांशी असलेली बांधिलकी वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आपणा सर्वांची उभारी वाढवणारी अशी ही घडामोड आहे. तरीही कायदा झाला. पण बऱ्याच गोष्टी हातातून निसटल्या. अशी या कायद्यासाठी जीवापाड प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भावना आहे. देशासाठी रोजगार हमीचा कायदा होऊनही त्यांना असे का वाटते, हे समजून घेण्यासाठी राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याची धावती का होईना ओळख करून घ्यायला हवी.

- राष्ट्रीय रोजगार हमी कायद्यानुसार...
- वर्षातले १०० दिवस रोजगाराची हमी
- अंगमेहनतीच्या कामासाठी रोजगार
- किमान वेतन (म्हणजेच दरडोई-दरदिवस मजुरी) ६० रु.
- रोजगार हमीची कामे काढणे आणि ती राबवणे यात ग्रामपंचायती आणि ग्रामसभांचा सहभाग, पण निर्णयाचा, निधी वापराचा अधिकार मात्र जिल्हा स्तरीय रोजगार हमी मंडळाकडे
- महाराष्ट्रातील रोजगार हमीप्रमाणेच बेकारभत्ता आणि कामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू किंवा दुखापत झाल्यास नुकसान भरपाई
- महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेप्रमाणेच कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, सावली, औषधोपचार, पाळणाघर अशा सोयी असणे बंधनकारक
- रोजगार हमीच्या कामावर देखरेख, तपासणीसाठी राज्य पातळीवर आणि जिल्हा पातळीवर रोजगार हमी मंडळे आणि त्यात अशासकीय सदस्य (यातले किमान ५ सदस्य -स्त्रिया) पण अशी कोणतीच तरतूद तालुका किंवा गावपातळीवर नाही.

राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याच्या या अगदी ठळक तरतुदी वाचताना तुम्हाला काही प्रश्न पडतात का? मला पडणारे काही प्रश्न असे आहेत;

वर्षातले १०० दिवस रोजगाराची हमी असेल तर इतर २६५ दिवस काय करायचं? विशेषत: ज्यांच्याकडे जगण्यासाठी मजुरीशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही अशांनी काय करायचे? हे तर तुम्हाला माहीतच आहे, की दोन वेळा खायची भ्रांत आहे अशा घरांतून कमावण्याची जबाबदारी अनेकवेळा बाईवरच असते. म्हणजे वर्षातले २६५ दिवस हक्काचा रोजगार नाही याची सगळ्यात जास्त झळ कोणाला लागणार?

वर्षातला निम्म्यापेक्षा जास्त काळ रोजगाराचा भरवसा नसेल तर 'जगायला बाहेर जायचं', म्हणजेच पोटासाठी वणवण्याचं चक्र थांबणार नाही, हे ही उघड आहे. आणि जेव्हा पोटासाठी गाव सोडून दुसऱ्या जिल्ह्यात, वेळप्रसंगी दुसऱ्या राज्यात, किंवा गावात राहून पण कित्येक मैल लांब खपण्याची वेळ येते तेव्हा सगळ्या कुटुंबाचेच हाल होतात, हे खरंच, पण बायांच्या कष्टात आणि शोषणातही भर पडते. अनेक वेळा बायांची सुरक्षितता धोक्यात येते, हेही आपण अनुभवतोच. म्हणजेच वर्षातले १०० दिवसच हक्काचा रोजगार याची झळ कोणाला पोचणार?

राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याच्या इतर तरतुदींबाबत काही गोष्टींकडे तुमचं लक्ष वेधावंसं वाटतं.

- रोजगार हमीच्या कारभारात ग्रामपंचायतीचा आणि ग्रामसभेचा सहभाग, अशी तरतूद असली तरी महिला ग्रामसभेचा उल्लेखच नाही.
- राज्य पातळीवर आणि जिल्हा पातळीवरच्या रोजगार हमी मंडळात किमान ५ स्त्री-सदस्यांची तरतूद नक्कीच महत्त्वाची आहे. पण तालुका आणि गाव पातळीवर रोजगार हमी मंडळाची, पर्यायाने स्त्रियांच्या सहभागाचीही तरतूदच नाही. मग रोजगार हमीच्या कारभारात बायांना हक्काची जागा मिळणार कशी?
- रोजगार हमीच्या कामाच्या ठिकाणी पाळणाघराची तरतूद असली तरी गरोदर स्त्रियांसाठी मात्र कोणत्याच तरतुदीचा उल्लेख नाही. महाराष्ट्राच्या रोजगार हमीत मात्र अशी तरतूद आहे.
- रोजगार हमीची कामे ठरवण्यात आणि ती राबवण्यात ग्रामपंचायतीचा सहभाग असला तरी गावाच्या परिसरातच काम निघावे, असे स्पष्टपणे म्हटलेले नाही. अशी तरतूद नसण्याची झळही बायांना अधिक पोचणार, हे वेगळे सांगायला

नको. महाराष्ट्राच्या रोजगार हमी कायद्यात मात्र ५ ते ८ कि. मी. च्या परिसरातच कामे निघावीत अशी तरतूद आहे हे मात्र येथे मुद्दाम सांगावयास हवे.

राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याबद्दल इतरही अनेक प्रश्न कार्यकर्ते आणि अभ्यासकांनी उभे केलेले आहेत. बायांशी अगदीच थेटपणाने संबंधित असणारे काही प्रश्न या लेखात तुम्ही विचार करावा म्हणून मांडलेले आहेत.

राष्ट्रीय रोजगार हमीबाबतचे हे प्रश्न – मुद्दे वाचताना नक्कीच तुमच्या मनात महाराष्ट्रातल्या रोजगार हमी योजनेचा विचार येत असणार. महाराष्ट्राच्या धर्तीवरच राष्ट्रीय पातळीवरचा कायदा बेतलेला असला तरी महाराष्ट्राच्या रोजगार हमीची गेल्या तीस वर्षांच्या अनुभवातून सिद्ध झालली वैशिष्ट्ये मात्र बाजूला सारण्यात आली आहेत.

वर्षभरात केव्हाही रोजगाराची हमी, गावाच्या परिसरातच काम, विशेष गरजा असलेल्या स्त्रियांचा विचार, गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंत रोजगार हमी मंडळे आणि दक्षता–समित्यांची तरतूद यामुळे राष्ट्रीय रोजगार हमीच्या तुलनेत महाराष्ट्रातील रोजगार हमी कायद्यात बायांसाठी अनुकूल गोष्टी निश्चितच जास्त आहेत. निदान कागदावर तरी. जेव्हा एखादी गोष्ट सरकारी कागदावर असते, तेव्हा ती प्रत्यक्षात आलीच पाहिजे असं म्हणायचा रस्ताही खुला होतो. पण आता या तरतुदी बदलण्याची मोठीच शक्यता आहे.

या लेखाच्या सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे रोजगार हमी योजनेबाबतची दुसरी घडामोड ती हीच. या घडामोडीची ओळख तर तुम्ही करून घ्यायलाच हवी.

खूप पैसा, वेळ, मनुष्यबळ खर्च होऊनही रोजगार हमी योजनेतून अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. तेव्हा योजनेच्या आजवरच्या यशापयशाचा आढावा घेऊन त्यात काळाप्रमाणे योग्य ते बदल करणं गरजेचं आहे. अशा विचारानं राज्य शासनानं सरकारी अधिकारी आणि बिगर सरकारी अभ्यासक, कार्यकर्ते यांची एक समिती नेमली. या समितीचं नाव 'पुनर्विलोकन समिती'. नावाप्रमाणेच या समितीने रोजगार हमीच्या आजपर्यंतच्या अनुभवांकडे पुन्हा वळून बघायचं होतं. आणि त्या आधारावर योजनेत काय बदल करायचे हे सुचवायचं होतं. या समितीनं त्यांचं काम नुकतंच (जून महिन्यात) सरकारला सादर केलं. समितीच्या अहवालात एकूण ४० शिफारसी आहेत. या शिफारसी प्रत्यक्षात आल्या तर आपल्या रोजगार हमी योजनेचा चेहरा–मोहराच संपूर्ण बदलणार आहे. विधानसभेच्या येत्या म्हणजेच हिवाळी अधिवेशनात या शिफारसी आमदारांसमोर मांडल्या जातील आणि त्यावर काहीच हालचाल आपल्या सर्वांच्या बाजूनं झाली नाही, तर मंजुरही होतील. (सरकारचा कारभार किती 'खुला' असतो याची ही अजून एक झलक, नाही का?)

पुनर्विलोकन समितीच्या शिफारसींची सविस्तर चर्चा हा लेखाचा विषय नाही. त्यामुळे त्यांची सविस्तर ओळखही येथे करून देत नाही. मात्र या शिफारसी आपल्यासाठी महत्त्वाच्या का आहेत, हे या लेखात सांगायलाच हवं. समितीच्या शिफारसी प्रत्यक्षात आल्या तर काय बदल होतील याची एक झलक –

- गावाच्या परिसरातच रोजगार हमीची कामे निघण्याचे बंधन राहणार नाही. एका गावातले मजूर दुसऱ्या गावी, दुसऱ्या जिल्ह्यात कायदेशीरपणे हलवता येतील.
- कंत्राटदारांचा आडमार्गाने होणारा शिरकाव टाळण्यासाठी कंत्राटदारांकडे उघडपणेच कामे दिली जातील.
- मंजुरी उपलब्ध करून देण्यापेक्षा काम होण्याला महत्त्व दिले जाईल. परिणामी यंत्रांचा वापर वाढेल.
- रोजगार हमीचा सर्व कारभार जलसंधारण खात्याकडे सोपवला जाईल.
- रोजगार हमीखाली मुख्यत: पाणलोट विकासाची कामे बदलली जातील

हे बदल वाचताना तुम्हाला कोणते धोके दिसतात ? यातले काही तुमच्या लक्षात येतायत का?

- स्थलांतर 'कायदेशीर' होणार म्हणजे पोटासाठी देशोधडीला लागण्याची सक्ती कायद्याकडूनच होणार – आमच्या गावात काम मिळालं पाहिजे असा आग्रह धरता येणार नाही. स्थलांतरामुळे कुटुंबाचे हाल तर होणारच, पण आधी सांगितल्याप्रमाणे त्याची झळ बायांना पोचणार.
- कंत्राटदारी वाढली की बायांवर अन्याय होण्याची शक्यता वाढणार. हा अनेक ठिकाणचा अनुभव आहे.
- यंत्रांचा वापर वाढणार म्हणजे मजुरी कमी होणार. जेव्हा मजुरी कमी होते तेव्हा बायांना घरी बसायला लागते, त्यांची मिळकत बंद होते, हाही अनुभव सगळीकडचाच
- योजनेचा कारभार एका खात्याकडे जाणार म्हणजे – पंचायतराजच्या व्यवस्थेत विभागला गेलेला कारभार जर फक्त जिल्हाधिकारी कचेरीतच एकवटला तर गावाच्या कारभाराचे होईल, तेच रोजगार हमीच्या कारभाराचे होणार. जेव्हा अधिकार एक हाती जातो, तेव्हा बायांची जागा नाहीशी होते हा अनुभवही आपण सगळ्यांनीच घेतलेला आहे.

कारभारणींनो – मैत्रिणींनो रोजगार हमी योजनेबाबतच्या घडामोडींचे धागे आपल्या जगण्याशी थेटपणेच भिडलेले आहेत. ते असे. आपण या घडामोडींना प्रतिसाद कसा द्यायचा? मला सहज सुचणाऱ्या काही गोष्टी अशा आहेत;

● एकीकडे या घडामोडी समजून घेणं, आपल्या अनुभवासंदर्भात त्या तपासून बघणं; महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेत उघडपणे मजूर–विरोधी असणारे बदल होऊ नयेत, यासाठी विविध संस्था–संघटनांनी प्रयत्न सुरू केले आहेत त्यात सहभागी होणं, तुमच्या गावात, तालुक्यात त्यासाठीचे कार्यक्रम करणं, हे करता येईल.

● दुसरीकडे आपल्या गावातला – परिसरातला रोजगार हमीचा कारभार सुधारणं हेही खूप महत्त्वाचं आहे. रोजगार हमी कायद्यामध्ये त्यासाठीच्या जागा आहेत. शिवाय माहितीचा अधिकारही आपल्या हातात आहे. पंचायतीच्या कारभारात आपली जागा निर्माण झालेली आहे. या तिन्ही गोष्टींचा उपयोग करून आपण करू शकू? काही उदाहरणं;

►महिला ग्रामसभेत आपल्या गावात कोणती कामं काढायला हवीत, ती कोणाला मिळायला हवीत याचे ठराव मंजूर करणं, हे ठराव मंजूर करताना बायांचे श्रम हलके होतील आणि बायांची ताकद वाढेल अशी कामं कोणती याचा विचार जाणीपूर्वक करता येईल. (जसं की सरपण, पाणी याच्याशी संबंधित)

►या ठरावांचा ग्रामपंचायात – तलाठी यांच्यामार्फत पाठपुरावा करणं. तालुक्याच्या कचेरीतून रोजगार हमीच्या कामांची नील प्रत मिळवणं, त्यात नवीन कामं सुचवणं यातून बायांना गरजेची, त्यांचे जगण्याचे प्रश्न हलके करणारी कामं तुमच्या गावात सुरू होऊ शकतील.

►जिथे रोजगार हमीची कामं सुरू आहेत तिथे मजुरी वेळेवर मिळते का, मजुरीचा हिशेब कामाच्या ठिकाणी फळ्यावर लिहिला आहे का, हे तपासणं, त्याचा आग्रह धरणं
रोजगार हमीचं कोणतं काम, कुठे, किती मजूर, किती मजुरी, काम कुठवर आलं, याची माहिती पंचायतीत दर आठवड्याला लावणं, दर पंधरवड्याला ग्रामसभेत त्याचं जाहीर वाचन घेणं
रोजगार हमीची हजेरी पत्रकं जाहीरपणे तपासणं – माहिती अधिकाराखाली ती मिळवता येतील.

►रोजगार हमीच्या ठिकाणी बायांना गरजेच्या सुविधा आहेत का हे तपासणं, कायद्यानुसार त्याचा आग्रह धरणं, ग्रामपंचायतीनं तहसिलदारांकडे, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनं पाठवणं.

►तुमच्या गावासाठी रोजगार समिती अस्तित्वात आहे का हे शोधणं, नसेलच तर ती तयार करणं, (यात महिलांचे प्रश्न पुढे आणू शकतील अशा सदस्या असतील अशी काळजी तुम्ही नक्कीच घ्याल).

►तुमच्या परिसरात एखादी महिला रोजगार हमी समितीची सदस्य असेल तर तिची ताकद कशी वाढवता येईल याचाही विचार करता येईल.

►तुमच्या भागातील रोजगार हमी प्रश्नाबाबत पालकमंत्र्यांकडे निवेदने देणे (पालकमंत्री रोजगार हमी समिती सदस्यांची नेमणूक करतात) आणि पाठपुरावा करणं.

ही यादी अजूनही लांबू शकेल. यातल्या कितीतरी आणि या पलीकडच्या गोष्टी तुमच्यापैकी काहींनी केल्या असतीलही. हा लेख वाचतानाही तुम्हाला नवनवीन गोष्टी सुचल्या असणार. तुम्ही त्या करून पाहणार यात शंकाच नही. पण आम्हालाही त्या जरूर कळवा.

रोजगार हमी हे स्वार्थी पुढारी आणि सरकारी यंत्रणेसाठीचे चराऊ कुरण होते, तसेच ते त्यांना जबाबदार करण्याचे आणि आपले जगण्याचे प्रश्न सोडवण्याचे साधनही होऊ शकते असे विविध ठिकाणचा अनुभव सांगतो. रोजगार हमी योजनेबाबत घडामोडी बघता, अशा अनुभवांचा गुणाकार होण्याची अतिशय गरज आहे, हे तुम्ही ओळखताच....

(टीप : पुनर्विलोकन समितीच्या अहवालाबाबत महाराष्ट्रातील संस्था, संघटनांनी सुरू केलेल्या प्रयत्नांबाबत 'प्रयास'शी संपर्क साधाता येईल.

प्रयासने गेल्या वर्षापासून रोजगार हमी योजनेबाबत कार्यकर्ते आणि अभ्यासकांच्या मदतीने अभ्यास आणि धोरण वकिलीचे प्रयत्न सुरू केले आहेत. या प्रयत्नांचा भाग म्हणून प्रयासने तयार केलेले अभ्यास साहित्यही कळविल्यास उपलब्ध होऊ शकते.)


संपर्कासाठी
**संसाधने आणि उपजीविका गट, प्रयास**
मंगेश पुष्प, स्वामी विवेकानंद सोसायटी,
वारजे–माळवाडी, स. नं. १३३, पुणे ५२.
फोन : ०२०–२५४३२८३६, ९८९०५६८५७७
ई–मेल : reli@prayaspune.org


■■■